मराठी माणसाचा मानदंड

राजदंड

। पश्चिम महाराष्ट्र ।

www.rajdand.com

follow us : /rajdandlive

RNI Regd. No. 72105/99 वर्ष २६ अंक ३४२ गुरूवार दि.१२ सप्टेंबर २०२४ पाने ४ किंमत ५/-

मरीन ड्राइव्हवरून थेट वांद्र्यात १२ मिनिटांत

कोस्टल रोड-वांद्रे सी-लिंक मार्गाचे आज उद्घाटन

मुबंई : मरीन ड्राइव्ह ते हाजीअलीपर्यंत ६.२५ किमीचा मार्गही सुरू झाला आहे. तर आता याच सागरी मार्गाला पुढे असणारा ४.५ किमी लांबीचा वांद्रे-वरळी सी-लिंक जोडण्यात आला आहे. मरीन ड्राइव्हवरून थेट वांद्र्यात १२ मिनिटांत;कोस्टल रोड-वांद्रे सी-लिंक मार्गाचे आज उद्घाटनमुंबई -पश्चिम उपनगरातील वाहतूक सुसाट होण्याच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण ठरणारा कोस्टल रोड वांद्रे-वरळी सी-लिंकला जोडण्याचे काम पूर्ण आहे. आजपासून या मार्गावरील प्रवास आता सुसाट होणार आहे. आज मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते कोस्टल रोड ते सी-लिंक मार्गाचे उद्घाटन होणार आहे.

बिंदू माधव चौकातून हिरवा कंदील दाखवल्यानंतर हा मार्ग वाहतुकीसाठी खुला होईल. या मार्गामुळे मरीन ड्राइव्हवरून थेट वांद्र्यापर्यंत १२ मिनिटांत पोहोचता येणार आहे. या प्रकल्पामुळे ७० टक्के वेळ आणि ३४ टक्के इंधनाची बचत होईल. कोस्टल रोडचे १० टक्के काम पूर्ण झाले असून, हा प्रकल्प अंतिम टप्प्यात आहे. या प्रकल्पात प्रिन्सेस स्ट्रिट फ्लायओव्हर ते वरळी सी-लिंक असा १०.५८ किमी लांबीचा कोस्टल रोड बांधण्यात आला आहे. मरीन ड्राइव्ह ते हाजीअलीपर्यंत ६.२५ किमीचा मार्गही सुरू झाला आहे. तर आता याच सागरी मार्गाला पुढे असणारा ४.५ किमी लांबीचा वांद्रे-वरळी सी-लिंक जोडण्यात आला आहे.

महत्त्वाचे

घरगुती गौरी गणपती विसर्जनेसाठी महापालिकेची यंत्रणा सज्ज

कोल्हापूर : घरगुती गौरी गणपती विसर्जनाकरिता महापालिकेची सर्व यंत्रणा सज्ज ठेवण्यात आली असून महापालिकेच्यावतीने विसर्जनाच्या कामकाजासाठी अडीच हजाराहून अधिक कर्मचा-यांच्या विविध ठिकाणी नियुक्त्या करण्यात आलेल्या आहेत. इराणी खण येथे गणेश मुर्ती विसर्जनासाठी मंगळवारी स्वयंचलित यंत्र बसविण्यात आले आहेत.

गणेश मुर्ती संकलनासाठी १४५ टँम्पो ४५० हमाल, ५ जे.सी.बी., ७ डंपर, ४ टॅक्टर, ४ पाण्याचे टँकर, २ बुम, ५ म्बुलन्स व ७ साधे तराफे व ७ फलोटींगचे तराफे अशी यंत्रणा सज्ज ठेवण्यात आली आहे. तसेच महापालिकेचे अग्निशमन दलाचे जवानही विसर्जनस्थळी सुरक्षीततेसाठी सर्व साधनसामुग्रीसह तैनात करण्यात येत असून विद्युत विभागाकडून विसर्जन ठिकाणी मोठी लाईटची व्यवस्था करण्यात आली आहे.

आरोग्य विभागाच्यावतीने विसर्जन ठिकाणांची साफसफाई करण्यासाठी आरोग्य निरिक्षकांच्या १२ टिम तयार करण्यात आल्या आहेत.

कोल्हापूर विमानतळ भूसंपादनाची प्रक्रिया तातडीनं राबवा

- खा. श्रीमंत शाहू महाराज छत्रपती

कोल्हापूर : कोल्हापुरातील उजळाईवाडी इथं असणाऱ्या विमानतळाच्या धावपट्टी विस्तारीकरणासाठी भूसंपादनाची प्रक्रिया तातडीनं राबवावी, अशा सूचना खासदार श्रीमंत शाहू महाराज छत्रपती यांनी उजळाईवाडी विमानतळ सल्लागार समितीच्या बैठकीत संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या. उजळाईवाडी इथल्या विमानतळाच्या धावपट्टी विस्तारीकरणासह नवीन हवाई मार्गावर विमानसेवा सुरु करणे, विमानतळावरील कार्गो सुविधा, महामार्ग ते विमानतळ रस्ता व पथदिवे, प्रवाशांना बस सुविधा पुरविणे, विमानतळ परिसरातील दोन गावांमध्ये कचरा प्रक्रिया केंद्र उभारणे आदी मुद्द्यांसह इतर महत्वाच्या तांत्रिक मुद्द्यांवर बैठकीमध्ये चर्चा झाली.

या बैठकीला खासदार धैर्यशील माने, आमदार ऋतुराज पाटील, जिल्हाधिकारी अमोल येडगे, जिल्हा सीईओ कार्तिकेयन एस., महापालिका प्रशासक के. मंजुलक्ष्मी, पोलिस अधीक्षक महेंद्र पंडित, करवीर प्रांताधिकारी हरिश धार्मिक, विमानतळ संचालक अनिल शिंदे यांच्यासह सल्लागार समितीचे सदस्य व्ही.बी. पाटील, किरण पाटील, तेज घाटगे, पार्थ नागेशकर, उत्तम आंबवडे यांच्यासह विविध विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

आजी-आजोबांना केंद्र सरकारचं मोठं गिफ्ट

आता ७० वर्षांवरील सर्वांना आयुष्मान भारत विमा कवच मिळणार

केंद्रीय मंत्रिमंडळाच्या आज (११ सप्टेंबर) झालेल्या बैठकीत अनेक मोठे निर्णय घेण्यात आले. या बैठकीतील सर्वात मोठा निर्णय म्हणजे, ७० वर्षांवरील वृद्धांचा आयुष्मान योजनेत समावेश करण्यात आला आहे. केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव याबाबत माहिती देताना म्हणाले, या निर्णयाचा देशातील ४.५ कोटी कुटुंबांमधील ६ कोटी ज्येष्ठ नागरिकांना फायदा होणार आहे. या सर्व वृद्धांना पाच लाख रुपयांच्या मोफत आरोग्य विमा कवच योजनेचा लाभ देण्याचं सरकारचं उद्दीष्ट आहे. या योजनेअंतर्गत सर्व पात्र लाभार्थ्यांना नवीन व स्वतंत्र आयुष्मान कार्ड दिलं जाणार आहे.

अश्विनी वैष्णव म्हणाले, पंतप्रधान नरेंद्र मोदींनी आजच्या बैठकीत स्पष्ट केलं की ७० वर्षांवरील ज्येष्ठ नागरिकांना आयुष्मान भारत पीएम जन आरोग्य योजनेंतर्गत संरक्षण द्यायला आपण वचनबद्ध आहोत. आयुष्मान भारत योजनेत आधीच समाविष्ट केलेल्या कुटुंबातील ज्येष्ठ नागरिकांचाही आता समावेश केला जाणार आहे. या ज्येष्ठांना दर वर्षी ५ लाख रुपयांपर्यंतचे अतिरिक्त टॉप-अप कव्हर मिळेल. जे ज्येष्ठ नागरिक सध्या केंद्र सरकारच्या कोणत्याही दुसऱ्या आरोग्य योजनेंतर्गत समाविष्ट असतील तर त्यांना आयुष्मान भारत योजनेत स्विच करण्यचा पर्याय असेल.

७० वर्षे किंवा त्याहून अधिक वय असलेल्या सर्व ज्येष्ठ नागरिकांचा या योजनेत समावेश करण्यात आला आहे. त्यांची सामाजिक, आर्थिक स्थिती विचारात न घेता सरसकट सर्वांना या योजनेचा लाभ दिला जाणार आहे. देशातील सर्व ज्येष्ठ नागरिक या आयुष्मान भारत पंतप्रधान जन आरोग्य योजनेचा लाभ घेण्यास (-इ झच-ग-ध) पात्र असतील. या पात्र नागरिकांना नवीन व स्वतंत्र आयुष्मान कार्ड दिलं जाणार असल्याचं वैष्णव यांनी यावेळी स्पष्ट केलं.

आंध्रप्रदेशात मिनी ट्रक पलटला; अपघातात ७ जणांचा मृत्यू

देवरापल्ली : आंध्र प्रदेशातील पूर्व गोदावरी जिल्ह्यात मिनी ट्रक उलटून ७ जणांचा मृत्यू झाला. ही घटना देवरापल्ली मंडलातील चिन्नईगुडेममधील चिलाका पाकला भागात मंगळवारी मध्यरात्रीनंतर २ वाजेच्या सुमाराला घडली. पूर्व गोदावरी जिल्ह्याचे पोलिस अधीक्षक नरसिंह किशोर यांनी याबाबत माहिती दिली.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार काजूने भरलेला मिनी ट्रक टी नरसापुरम मंडलातील बोरामपालम येथून निदादावोलू मंडलातील ताडीमल्लाकडे जात होता. यावेळी चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटल्याने ट्रक उलटला. अपघातानंतर काजूच्या गोण्यांखाली दबल्यामुळे लोकांचा मृत्यू झाला. पोलिस आणि स्थानिकांनी पोत्याखालून मृतदेह बाहेर काढून पोस्टमॉर्टमसाठी शासकीय रुग्णालयात नेले. मृतांमध्ये देबाबत्तुला बुरैया (४०), तम्मीरेड्डी सत्यनारायण (४५), पी. चिन्मुसलय (३५), कट्टाव कृष्णा (४०), कट्टावा सत्तीपांडू (४०), तडीमल्ला येथील तड्डी कृष्णा (४५) आणि कटकोटेश्वर येथील समिश्रगुडेम मंडल यांचा समावेश आहे.

बेकायदेशीरपणे शस्त्र बाळगल्याप्रकरणी उंचगावमधील एकाला अटक

कोल्हापूर : गणेश उत्सवाच्या काळामध्ये कोणताही अनुचित प्रकार घडू नये, यासाठी पोलीस अधीक्षक महेंद्र पंडित यांच्या आदेशानुसार स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेनं बेकायदेशीरपणे शस्त्रं बाळगणाऱ्या लोकांची गोपनीय पध्दतीनं माहिती घेतली. त्यानुसार उंचगाव मधील मणेर मळा परिसरातील विठलाई कॉलनी इथं रहाणाऱ्या वीस वर्षीय रोहन रुपेश पाटील(वय २०) याच्याकडं एक पिस्टल, एक रिव्हॉल्वर आणि दोन जिवंत राऊंड अशा एकूण एक लाख एक हजार रुपये किंमतीच्या वस्तू आढळून आल्या. त्याच्यावर गांधीनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून त्याला ताब्यात घेण्यात आले आहे.

स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेचे निरीक्षक रवींद्र कळमकर, सहाय्यक पोलीस निरीक्षक चेतन मसुटगे, वैभव पाटील, संतोष बरगे, परशुराम गुजरे, गजानन गुरव, प्रवीण पाटील, प्रदीप पाटील, विशाल खराडे, महेंद्र कोरवी यांच्या पथकानं ही कारवाई केलीय. गांधीनगर पोलिस या प्रकरणी अधिक तपास करत आहेत.

येत्या वर्षभरात धुळे जिल्ह्यातील सव्वा लाख एकर जमीन सिंचनाखाली येणार

धुळे : सुलवाडे जामफळ कनोली उपसा सिंचन योजनेच्या जामफळ धरण बंदिस्त नलिका वितरण प्रणालीच्या माध्यमातून येत्या वर्षभरात धुळे जिल्ह्याच्या शिंदखेडा तालुक्यातील सव्वा लाख एकर जमीन सिंचनाखाली येणार असून या प्रकल्पामुळे या परिसरातील शेती ही सुजलाम सुफलाम होवून येथील परिसरात हरीत क्रांती होईल. असे प्रतिपादन राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस यांनी मौजे सोंडले, ता. शिंदखेडा येथे केले.

सुलवाडे जामफळ कनोली उपसा सिंचन योजनेच्या जामफळ धरण बंदिस्त नलिका वितरण प्रणालीचा भूमिपूजन समारंभ उपमुख्यमत्री श्री. फडणवीस यांच्या हस्ते पार पडला, यावेळी ते बोलत होते. कार्यक्रमास पालकमंत्री गिरीश महाजन,

जिल्हा परिषद अध्यक्ष धरती देवरे, खासदार डॉ. शोभा बच्छाव, आमदार अमरीश पटेल, जयकुमार रावल, काशिराम पावरा, मंजुळा गावित, जलसंपदा विभागाचे अपर मुख्य सचिव दीपक कपूर, जिल्हाधिकारी जितेंद्र पापळकर, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विशाल नरवाडे, जिल्हा पोलीस अधिक्षक श्रीकांत धिवरे, तापी पाटबंधारे विकास महामंडळाचे कार्यकारी संचालक ज. द बोरकर, अधिक्षक अभियंता सु. स, खांडेकर, माजी खासदार डॉ. सुभाष भामरे, माजी आमदार राजवर्धन कदमबांडे यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री श्री. फडवणीस म्हणाले की, आजचा दिवस धुळे जिल्ह्यासाठी महत्त्वाचा दिवस आहेत. आजपासून खऱ्या अर्थाने शिंदखेडा तालुक्याची दुष्काळमुक्तीकडे वाटचाल सुरू झाली आहेत. या प्रकल्पामुळे शिंदखेडा तालुक्यातील सव्वा लाख एकर जमीन सिंचनाखाली येणार आहेत. सुलवाडे जामफळ कनोली उपसा सिंचन योजनेला सन १९९९ मध्ये मंजूरी दिली. सन १९९९ मध्ये प्रशासकीय मान्यता मिळाल्यापासून १८ वर्षात २६ कोटी निधी उपलब्ध झाला. तर गेल्या सात वर्षात २१०० कोटी रुपयांचा निधी देऊन या प्रकल्पाला चालना दिली. हा प्रकल्प पुर्ण होण्यासाठी प्रधानमंत्री नरेंद्र मोदींना समक्ष भेटून पश्चिम महाराष्ट्र व उत्तर महाराष्ट्राचा दुष्काळ कायमस्वरुपी दूर करण्यासाठी बळीराजा जलसंजिवनी योजनेत समाविष्ट करुन राज्याच्या दुष्काळी भागासाठी कृषी सिंचन योजनेतून ३० हजार कोटी रुपयांच्या प्रकल्पांना त्वरीत मंजूरी दिली.

सुलवाडे जामफळ उपसा सिंचन योजनेचे काम मोठ्या गतीने सुरू असून पुर्णत्वाकडे आहे, त्यानंतर तापी नदीचे जामफळ धरणात आलेले पाणी शिंदखेडा तालुक्यातील ५४ गावांना जामफळ धरणातून ७२८ किलोमिटर लांबीच्या भूमिगत पाईप लाईनद्वारे शेतीसाठी पाणीपुरवठा होणार आहे. यामुळे या गावातील एकूण ४२ हजार ५१३ हेक्टर जमीन एका वर्षात सिंचनाखाली येणार आहे. या कामासाठी माजी खासदार डॉ. सुभाष भामरे व आमदार जयकुमार रावल यांनी सतत पाठपुरावा केल्याचेही त्यांनी सांगितले.

तापी नदीतील पावसाळ्यातील वाहून जाणारे महाराष्ट्राचे हक्काचे ९.२४ टी.एम.सी पाणी ५ पंपगृहांमध्ये स्थापित होणाऱ्या ७५ हजार ४५८ एचपी क्षमतेच्या ३२ पंपाद्वारे उपसा करून शिंदखेड्यातील ५४ गावातील ४२ हजार ५१३ हेक्टर तर धुळे तालुक्यातील ४९ गावातील १० हजार २०७ हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली येणार आहे. तसेच हे पाणी पारंपरिक पद्धतीने कालवा वितरण प्रणाली ऐवजी गुरुत्वीय बंदिस्त वितरण प्रणालीद्वारे देण्यात येणार असल्याने वीजेचा खर्च कमी येणार आहे.

राज्यभरातून शरद पवार यांच्या राष्ट्रवादीत जोरदार इनकमिंग

बडे नेते तुतारी हाती घेण्यासाठी इच्छुक

पुणे : राज्य विधानसभा निवडणुका जसजशा जवळ येऊ लागल्या आहेत. तसतशी राजकीय वर्तुळातील हालचालींनाही वेग आला आहे. लोकसभा निवडणुकीत मिळालेल्या विजयानंतर राज्यभरातून शरद पवार यांच्या राष्ट्रवादीत जोरदार इनकमिंग सुरू झाले आहे. अनेक बडे नेते तुतारी हाती घेण्यासाठी इच्छुक आहेत. शरद पवार राज्यभरात सुरू असलेल्या दौऱ्यातून शरद पवार निवडणुकासाठी तगड़े उमेदवार शोधत आहेत. अशातच गेल्या दोन-तीन दिवसांपासून पुण्यातील शरद पवार यांच्या निवासस्थानी अनेक नेत्यांनी शरद पवारांची भेट घेतल्याने महायुतीचे मात्र टेन्शन वाढले आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार यांच्या राष्ट्रवादीने आगामी विधानसभा निवडणुकीसाठी कंबर कसली आहे. प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील,खासदार अमोल कोल्हे यांच्यासह काही नेतेमंडळींनी शिवस्वराज्य यात्रा काढली आहे. त्यातच शरद पवार हेदेखील मैदानात उतरल्याने या निवडणुकीला वेगळीच रंगत आली आहेत. विशेष म्हणजे गेल्या आठवड्याभरापासून शरद पवार यांच्या पुण्यातील आणि बारामतीतील निवासस्थानी बड्या नेत्यांची रेलचेल सुरू झाली आहे. शरद पवार यांच्या पक्षाकडून निवड़णुकीचे तिकीट मिळवण्यासाठी अनेकांनी मोठी फिल्डिंगही लावल्याचे दिसत आहे.

गेल्या काही दिवसांपासून इंदापूरचे माजी आमदार हर्षवर्धन पाटील शरद पवारांच्या राष्ट्रवादीत येण्यास इच्छुक आहेत. कालच भोसरीचे माजी आमदार विलास लांडे यांनीही शरद पवार यांची भेट घेतली. त्यानंतर आज साताऱ्यातील माण-खटावचे सातारा जिल्हा बँकेचे संचालक अनिल देसाई यांनी आपल्या समर्थकांसह शरद पवार यांची भेट घेतली. या भेटीतही त्यांनी माण-खटावमधून विधानसभेची उमेदवारी मिळावी, याबाबत चर्चा झाल्याचे स्वत: अनिल देसाईंनी सांगितले. गेल्य १५ वर्षांपासून मी थांबलो आहे. पण मला माणच्या उर्मट आमदारांना धडा शिकवायचा आहे. त्यामुळे मला उमेदवारी पाहिजे, असे अनिल देसाईंनी म्हटले.

याशिवाय, काल पंढरपूरचे माजी सभापती वसंत देशमुख, भगीरथ भालके, नगराध्यक्ष नागेश भोसले, राज्याचे आरोग्य मंत्री तानाजी सावंत यांचे पुतणे अनिल सावंत, काँग्रेसचे आदित्य फत्तेपूरकर यांच्यासह अनेक आजी-माजी कार्यकर्त्यांनी शरद पवार यांची भेट घेत त्यांच्याकडे उमेदवारीची मागणी केली. विशेष म्हणजे एकेकाळी शरद पवार यांचे कट्टर समर्थक औदुंबर अण्णा पाटील यांचे नातू अमरजीत पाटील यांनीही शरद पवार यांची भेट घेऊन उमेदवारीची मागणी केली आहे. त्यामुळे शरद पवार कोणाकोणाला उमेदवारी देणार हे आगामी काळच ठरवणार आहे.

यासोबतच, फलटण- कोरेगाव विधानसभा मतदारसंघातून बौद्ध समाजाला उमेदवारी मिळावी, य़ा मागणीसाठी फलटणमधील बौद्ध समाजाचे अनेक पदाधिकाऱ्यानीही शरद पवार यांची भेट घेतल्याची माहिती आहे. दरम्यान, माण-खटाव तालुक्यातील भाजप आमदार जयकुमार गोरे यांच्याविरोधात शरद पवार गटाकडून प्रभाकर देशमुख यांना उमेदवारी मिळण्याची शक्यता आहे. पण याच

ठिकाणी शिवसेना ठाकरे गटाकडून शेखर गोरे हेदेखील इच्छुक असल्याचे सांगितले जात आहे. पण अनिल देसाई यांनीही या मतदार संघावर दावा केला आहे. त्यामुळे महाविकास आघाडीमध्येच उमेदवारीवरुन वादंग वाढण्याची शक्यता आहे.

विजेला धक्का

...कारण मुळात आपल्याकडे हे क्षेत्र सवलतीवर तगले आणि वाढले. त्याची 'हवा'च अधिक झाली, सोयी वाढल्या नाहीत आणि प्रत्यक्षात 'सीएनजी'सारखा स्वस्त पर्यायही आहेच...

विजेवर चालणाऱ्या मोटारींवर दिलेल्या सवलतींबाबत वाहतूकमंत्री नितीन गडकरी यांच्या मताशी कोणीही शहाणे सहमत होतील. विद्यामान केंद्र सरकारात असूनही नितीनभाऊंची मते नेहमीच वास्तवाच्या जवळ जाणारी असतात आणि मुख्य म्हणजे ती व्यक्त करण्यात ते कचरत नाहीत. मग ती बाब सद्या:स्थितीतील सत्ताकारणाची असो वा वैद्याकीय विम्यावर अवाच्या सवा कर आकारणीबाबतची असो. नितीनभाऊ उगाच कोणास काय वाटेल याची तमा बाळगत गप्प राहात नाहीत. दणकून बोलतात. आताही त्यांनी विजेवर चालणाऱ्या मोटारींस दिल्या जाणाऱ्या सवलतींबाबत असेच भाष्य केले. निमित्त होते जागतिक वीज मोटार दिनाचे. ही असली दिनविशेष-खुळे हल्ली वाढत चालली असून जागतिक वीज मोटार दिन (इलेक्ट्रिकल व्हेईकल (ईव्ही) डे) हे एक यातील ताजे खूळ. या निमित्ताने गडकरींनी किती काळ या विजेवर चालणाऱ्या मोटारींस सवलती देत राहणार असा प्रश्न उपस्थित केला. तो अत्यंत रास्त आहे. याचे साधे अर्थशास्त्रीय कारण असे की हे असे सवलतींच्या जोरावर विस्तारणारे क्षेत्र सवलती काढून घेतल्यावर आक्रसते, असा सर्वसाधारण अनुभव. तो याही बाबतीत येणार नाही, अशी खात्री देता येत नाही. त्यामुळे सवलतजन्य क्षेत्राची वाढ कृत्रिम असते. दिवाळी वा नाताळात भव्य दुकानदार सवलतींचा वर्षाव करून ग्राहकांस आकृष्ट करून घेतात. हे सण संपले की खरेदी-विक्री व्यवहार रोडावतो. म्हणून ही अशी सवलतजन्य वाढ तात्पुरती आणि फसवी ठरते. गडकरींच्या विधानाचा तोच अर्थ आहे. अर्थात हे मत व्यक्त करताना सवलती सुरूच ठेवायच्या की बंद करायच्या याचा अधिकार आपला नाही, हेही ते स्पष्ट करतात. तेव्हा त्यांनी व्यक्त केलेल्या मतांवर भाष्य करण्याआधी विजेवर चालणाऱ्या मोटारींस सवलती आहेत तरी काय, हे लक्षात घ्यायला हवे.

वाहनांतून होणारे कर्बउत्सर्जन हे पर्यावरणास घातक आहे; सबब पर्यायी ऊर्जास्रोत विकसित व्हावेत या विचाराने केंद्र सरकारने विजेवर चालणाऱ्या मोटारींच्या निर्मितीस उत्तेजन देण्यासाठी योजना जाहीर केली. 'फास्टर ॲडॉप्शन ऑफ मॅन्युफॅक्चरिंग ऑफ इलेक्ट्रिक व्हेईकल्स' ऊर्फ 'फेम' ही योजना २०१५ साली सुरू झाली. विजेवर चालणाऱ्या मोटारी बनवणाऱ्या उत्पादकांस भांडवली गुंतवणुकीवर सवलती, करांत सूट, आर्थिक अनुदान इत्यादींचा अंतर्भाव यात होता. या 'फेम-१'ने विजेवर चालणाऱ्या मोटारनिर्मितीचा पाया रचला गेला. ते आवश्यक होते. तथापि यावर स्थिरावलेल्या उद्योगास खरी गती आली ती 'फेम-२' या २०१९ साली प्रसृत केल्या गेलेल्या सवलतींच्या दुसऱ्या टप्प्यात. ओला, एथर, बजाज आदी उत्पादकांनी या सवलतींचा आधार घेऊन विजेवर चालणाऱ्या वाहनांची मोठ्या प्रमाणावर निर्मिती सुरू केली. एथरसारखी पूर्ण नवी कंपनी याच काळात उदयास आली. या दुसऱ्या सवलत-पर्वात मोटार उत्पादकांच्या बरोबरीने मोटारींतील सुट्या भागांच्या उत्पादकांसही (ओरिजिनल इक्विपमेंट मॅन्युफॅक्चरर्स -म्हणजे ओईएम) घसघशीत आर्थिक उत्तेजन दिले गेले. परिणामी विजेवर चालणारी वाहने निर्मिणाऱ्या उत्पादकांस चांगली बरकत आली.

तथापि या वाहत्या सवलतगंगेत वाहन उद्योगांनीही हात मारून घेतला. विजेवर चालणाऱ्या मोटारीस आवश्यक चार्जर त्यांनी मोफत देणे अपेक्षित असताना त्याचेही पैसे ग्राहकांकडून उकळले. म्हणजे ज्याच्या उत्पादनासाठी या निर्मात्यांस केंद्र सरकारने सवलती दिल्या, त्या त्यांनी घेतल्याच; पण वर हे चार्जरही विकले. अशा अनेक तक्रारी सरकारकडे आल्यावर या सवलतींबाबत फेरविचार केला गेला. त्यामुळे झाले असे की या वर्षीच्या मार्चपासून 'फेम-२'च्या सवलतींबाबत सरकारने हात आखडता घ्यायला सुरुवात केली. ते योग्य होते. यातील काही सवलती उत्पादकांप्रमाणे ग्राहकांसही होत्या. म्हणजे वाहन नोंदणी सवलत इत्यादी. काही राज्यांनी त्याही काढून घ्यावयास सुरुवात केली आणि केंद्रानेही त्याकडे काणाडोळा केला. एव्हाना विजेवर चालणाऱ्या वाहनांची मागणी वाढीस लागली होती आणि त्यामुळे सवलतींचा टेकू काढण्याची गरज होती. तो प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे काढला गेला. पण याचा परिणाम असा झाला की यंदाच्या मार्च महिन्यापासून या मोटारींची विक्री चांगलीच गडगडली. हे सवलती रद्द वा कमी करणे अघोषितपणे केले गेले. त्यामुळे या मोटार उत्पादकांची धांदल उडाली आणि परिणाम विक्रीवर झाला. हे घसरणे किती असावे? यंदाच्या मार्च महिन्यात संपूर्ण देशभरात २,१३,०३६ इतकी वीज-वाहने विकली गेली. या महिन्याच्या अखेरीस सवलतींनी हात आखडता घेतला आणि पुढल्याच महिन्यात ही विक्री १,१५,८५० इतकी कमी झाली. पुढे मे महिन्यात एक लाख ४० हजार आणि जूनमधे एक लाख ३९ हजार अशी ही घसरण राहिली. नंतरच्या जुलै महिन्याने काहीसा हात दिल्याने या वाहनांची विक्री एक लाख ७८ हजारांवर नेली आणि ऑगस्टने पुन्हा यातून जवळपास २० हजारांची घट अनुभवली.

हे आपले आजचे विजेवर चालणाऱ्या वाहनांचे वास्तव. आज स्थिती अशी की शहरांत विजेवर चालणाऱ्या दुचाकींच्या विक्रीत लक्षणीय वाढ झाल्याचे दिसते. त्याच वेळी खाद्यान्न घरपोच आणून देणारे, किराणा पोहोचवणारे आदींनी विजेवर चालणाऱ्या वाहनांस जवळ केल्याने त्याही वाहनांच्या संख्येत वाढ झाली. तथापि प्रवासी वाहनांचा प्रतिसाद इतका उत्साहवर्धक नाही. ते साहजिक. कारण सरसकट वाहने 'चार्ज' करण्याच्या सुविधांचा अभाव आणि त्या सुविधांचे प्रमाणीकरण नसणे. तसेच या कालावधीत नैसर्गिक वायूवर (कॉम्प्रेस्ड नॅचरल गॅस) चालणाऱ्या वाहनांची विक्री लक्षणीयरीत्या वाढली आणि हे वायू भरण्याच्या सोयीही वाढत गेल्याने ही वाहनेही ग्राहकांस अधिक आकर्षक वाटू लागली. बजाजसारख्या पारंपरिक दुचाकी निर्मात्यांनी जगात प्रथमच नैसर्गिक वायूवर चालणारी मोटारसायकल बाजारात आणल्याने त्याबाबतही स्पर्धा सुरू झाली. तेव्हा अशा वातावरणात बाजारात नुसता टिकाव नव्हे तर भरभराट साधावयाची असेल तर विजेवर चालणाऱ्या वाहनांसाठी स्पर्धा अधिकच खडतर झाली. 'फेम' सवलती आटू लागल्या आणि नैसर्गिक वायुआधारित वाहने आकर्षक होऊ लागली. हे एकाच वेळी होत गेल्याने विजेवरील वाहनांचा विस्तार स्तब्ध झाल्याचे चित्र निर्माण झाले.

ते खरे आहे. गडकरी या उद्योगाच्या सवलती रद्द करा अशी मागणी करतात ती या पार्श्वभूमीवर. त्यांच्या मते या वाहनांचा 'प्रसार' (?) पाहता त्यांच्या किमतीही पेट्रोल-डिझेलवरील वाहनांच्या पातळीवर यायला हव्यात आणि तसे होत असेल तर या क्षेत्राच्या सवलती सुरू ठेवण्याची गरज नाही. तथापि गडकरी यांची सूचना प्रत्यक्षात आल्यास या वाहनांच्या मागणीत घट होणार हे निश्चित. याचे कारण या वाहनांच्या प्रसाराबाबत केली गेलेली हवा. हा सरकारी प्रचार इतका तीव्र होता की त्यावर विश्वास ठेवणाऱ्यास ''झाले आता प्रचलित इंधनांवरील मोटारींचा अस्त झाला'', असे वाटावे. हे वास्तव किती 'खरे' आहे हे वरील आकडेवारीवरून लक्षात यावे. इतका (अप) प्रचार करूनही आजमितीस या मोटारींचा वाटा पारंपरिक वाहनांच्या तुलनेत १० टक्के इतकाही नाही. यास अनेक कारणे आहेत. पर्यावरणस्नेही म्हणत विजेवर चालणाऱ्या वाहनांचा प्रसार करायचा आणि वीज मात्र अत्यंत प्रदूषित पद्धतीने कोळसा जाळून तयार करायची, असा हा अर्धवटपणा. तो जेवढा लवकर लक्षात येईल तेवढे पर्यावरणासाठी बरे. त्यासाठी विजेवर चालणारी वाहने बनवणाऱ्यांना सवलतशून्यतेचा धक्का जरा बसायलाच हवा.

सप्टेंबर हडपसरमधील विठ्ठल तुपे पाटील नाट्यगृहास उपमुख्यमंत्री अजित पवार यांची भेट

हडपसर, : हडपसर मध्ये विठ्ठल तुपे पाटील नाट्यगृहाचे लोकार्पण सोहळा शनिवारी करण्यात आला.जवळपास ४५ कोटी खर्च करून ८३८ आसन क्षमता असलेले अत्याधुनिक सोयीसुविधेने उभारण्यात आलेले महाराष्ट्र राज्यात कुठेच पहायला मिळणार नाही अशी भव्य देखणी वास्तु पुणे महापालिकेच्या माध्यमातून उभारण्यात आली . परंतु उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते लोकार्पण सोहळा आयोजित करण्यात आलेला होता शनिवारी ७ सप्टेंबर रोजी उद्घाटन सोहळ्यास अजित पवार राहिले नसल्याने त्यावेळी

लिलावती विठ्ठल तुपे , मनपा आयुक्त डॉ.राजेंद्र भोसले यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले.

अजित पवार लोकार्पण सोहळ्यास कांही कारणास्तव उपस्थित राहिले नसल्या मंगळवारी नाट्यगृहास भेट देऊन नाट्यगृहाची संपूर्ण पहाणी केली. वास्तु बांधणा-या अर्किटेकची प्रशंसा करीत नाट्यगृह छान तयार करण्यात आले असल्याचे अजित पवार यांनी पहाणी करतेवेळी बोलत होते. नाट्यगृह पहाणी करतेवेळी हडपसर विधानसभेचे आमदार चेतन तुपे पाटील, मनपा आयुक्त डॉ. राजेंद्र भोसले , शहर अभियंता प्रशांत वाघमारे, संदिप बधे, अमर तुपे , इशान तुपे, अजिनाथ भोईटे,वामन धाडवे, अरुण आल्हाट,नाट्य कलाकार प्रशांत बोगम, आदी मान्यवर उपस्थित होते.

शिवसेना शिंदे गटाला अधिक किंवा समान जागा मिळाव्या : अर्जुन खोतकर

मुंबई, दि. ११ वृत्तसंस्था : राज्यातील विधानसभा निवडणुका महायुतीकडून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली लढवल्या जाणार आहेत. त्यामुळे शिंदे गटाला अधिक जागा मिळाव्या किंवा समप्रमाणात जागावाटप व्हावे, अशी मागणी शिंदे गटाचे आमदार व माजी मंत्री अर्जुन खोतकर यांनी केली आहे.

एकीकडे वरिष्ठ पातळीवर नेत्यांमध्ये जागा वाटपाच्या चर्चा होत असताना दुसऱ्या फळीतील नेते कार्यकर्ते जागा वाटपाबाबत मागणी आणि विधाने करीत आहेत. अनेक वाचाळवीरांना समज देऊनही त्याचा काही उपयोग होत असलेला दिसत नाही. त्यामुळे महायुतीत सारे काही आलबेल नाही, असा संदेश दिला जात आहे.

अशाच प्रकारे खोतकर यांनी महायुतीमध्ये शिवसेना शिंदे गटाला अधिक जागा मिळाव्या किंवा समान जागावाटप करावे, अशी मागणी पत्रकारांशी बोलताना केली आहे. अर्थात जागा वाटपाबाबतचा निर्णय मी नव्हे तर वरिष्ठ नेते घेतील, असेही त्यांनी स्पष्ट केले. महायुतीत जागावाटपादरम्यान काही जागांवर सर्वच घटक पक्षांचा आग्रह असू शकतो. काही वेळा पक्ष कार्यकर्ते टिकवण्यासाठी एखाद्या जागेवर टोकाचा आग्रह करावा लागतो. अन्यथा नेते कार्यकर्ते इकडे तिकडे जाण्याची शक्यता असते. अशावेळी घटक पक्षांमध्ये मैत्रीपूर्ण लढती अनिवार्य असणार आहेत. यापूर्वी देखील अशा मैत्रीपूर्ण लढती झाल्या आहेत, असे खोतकर यांनी नमूद केले. शिंदे गटाचा नवा कार्यक्रम निवडणूक प्रचाराचा एक भाग म्हणून शिवसेना शिंदे गटाने एक नवा कार्यक्रम हाती घेतला आहे. या कार्यक्रमांतर्गत शिंदे गटाचे नेते किमान १५ घरात जाऊन महिलांशी चर्चा करणार आहेत. त्यांना मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेचा लाभ मिळाला का, त्यामध्ये त्यांना कोणत्या अडचणी आल्या,

हिंदकेसरी पैलवान मारूती माने स्मारकातील अपूर्ण कामे सर्वोच्च प्राधान्याने पूर्ण करावीत

सांगली : आंतरराष्ट्रीय कुस्तीपटू पैलवान मारूती माने यांच्या कवठेपिरान येथील स्मारकातील अपूर्ण कामे प्राधान्याने पूर्ण करावीत. ही कामे गुणवत्तापूर्ण व दर्जेदार करावीत, अशा सूचना पालकमंत्री डॉ. सुरेश खाडे यांनी आज येथे दिल्या.

कवठेपिरान (ता. मिरज) येथे बांधण्यात येत असलेल्या आंतरराष्ट्रीय कुस्तीपटू हिंदकेसरी पैलवान मारूती माने स्मारक समितीच्या बैठकीच्या अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते. जिल्हाधिकारी कार्यालयाच्या बैठक सभागृहात झालेल्या या बैठकीस जिल्हाधिकारी डॉ. राजा दयानिधी, प्रभारी मुख्य कार्यकारी अधिकारी नंदिनी घाणेकर, जिल्हा नियोजन अधिकारी अशोक पाटील, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता क्रांतीकुमार मिरजकर, माजी आमदार दिनकर पाटील, निशिकांत पाटील, नामदेवराव मोहिते, विठ्ठल पाटील, भीमराव माने, रघुनाथ दिंडे, वास्तुविशारद प्रमोद चौगुले यांच्यासह स्मारक समितीचे सदस्य उपस्थित होते.

पालकमंत्री डॉ. सुरेश खाडे म्हणाले, हिंदकेसरी पैलवान मारूती माने स्मारकातील अपूर्ण कामे सर्वोच्च प्राधान्याने करावीत. कामाच्या दर्जामध्ये कोणतीही तडजोड केली जावू नये. हिंदकेसरी पैलवान मारूती माने यांच्या पुतळ्यातील त्रुटी दूर कराव्यात. सर्व कामे

महिनाभरात पूर्ण करून स्मारक हस्तांतरणाची कार्यवाही तातडीने पूर्ण करण्याचे आदेश त्यांनी यावेळी दिले.

यावेळी स्मारक समिती सदस्यांनी मौलिक सूचना मांडल्या. तसेच, स्मारकात हिंदकेसरी पैलवान मारूती माने यांचा हुबेहुब पुतळा उभारावा, अशी अपेक्षा व्यक्त केली.

क्रांतीकुमार मिरजकर यांनी स्मारकासंदर्भात केलेल्या कार्यवाहीबाबत सादरीकरण केले. शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्या शासन निर्णयान्वये हिंदकेसरी पैलवान मारूती माने यांच्या कवठे पिरान या मूळ गावी स्मारक बांधण्यास प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली आहे. यामध्ये मुख्य इमारतीसह प्रवेश गॅलरी, हिंदकेसरी पैलवान मारूती माने यांचा पुतळा, म्युझिअम, रेस्टलिंग प्रॅक्टिस हॉल, स्वच्छता गृह, अंतर्गत रस्ते, कुंपण भिंत, प्रवेशद्वार आदि कामे प्रस्तावित करण्यात आली आहेत. स्मारक बांधकामासाठी १५ सदस्यांची समिती गठित करण्यात आली आहे. स्मारकाच्या बांधकामासाठी जवळपास ४ कोटी ९० लाख रुपयांपैकी जवळपास ४ कोटी ९ लाख रूपये निधी प्राप्त असून मुख्य इमारतीचे बांधकाम पूर्ण झाले असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

सामाजिक न्याय विभागांतर्गत जिल्ह्यातील मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठीच्या वसतिगृहात विद्यार्थ्यांना सर्व सोयी सुविधा उपलब्ध करून द्याव्यात. वसतिगृह निरीक्षण समितीच्या सदस्यांनी वसतिगृहांना भेटी देऊन देण्यात आलेल्या सुविधांचा आढावा घ्यावा, अशा सूचना कामगार मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. सुरेश खाडे यांनी आज येथे दिल्या.

जिल्हास्तरीय वसतिगृह निरीक्षण समितीच्या बैठकीत ते बोलत होते. जिल्हाधिकारी कार्यालयाच्या बैठक सभागृहात झालेल्या या बैठकीस जिल्हाधिकारी डॉ. राजा दयानिधी, प्रभारी मुख्य कार्यकारी अधिकारी नंदिनी घाणेकर, जिल्हा नियोजन अधिकारी अशोक पाटील, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता क्रांतीकुमार मिरजकर, समाजकल्याण विभागाचे सहाय्यक आयुक्त जयंत चाचरकर, जिल्हा समाजकल्याण अधिकारी बाळासाहेब कामत, शिक्षणाधिकारी (प्राथमिक) मोहन गायकवाड आदि उपस्थित होते.

पालकमंत्री डॉ. सुरेश खाडे म्हणाले, सांगली जिल्ह्यात एकूण २१ वसतिगृहे असून, त्यापैकी १० मुलींची व ११ मुलांची वसतिगृहे आहेत. या वसतिगृहात विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकासासाठी पूरक सुविधा उपलब्ध करून द्याव्यात. वसतिगृहासाठी सामाजिक न्याय विभागाच्या स्वमालकीच्या इमारतींसाठी प्रयत्न करावेत. जिल्ह्यात १२५ वी जयंती मुलींचे शासकीय वसतिगृह, सांगली व गुणवंत मुलांचे शासकीय वसतिगृह अशा दोन इमारतींचे बांधकाम पूर्ण झाले आहे. दोन्ही वसतिगृहात पाणीपुरवठा सुरू करून इमारत हस्तांतरणाची प्रक्रिया पूर्ण करावी. तसेच, शासकीय वसतिगृहांच्या अत्यावश्यक दुरूस्तीचे काम तातडीने पूर्ण करावे. वसतिगृह निरीक्षण समितीच्या सदस्यांनी वसतिगृहांना भेटी देऊन, विद्यार्थ्यांशी संवाद साधावा. त्यांच्या अडीअडचणी समजून घ्याव्यात, असे त्यांनी यावेळी सूचित केले.

यावेळी पालकमंत्री डॉ. सुरेश खाडे यांनी मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेंतर्गत जिल्ह्यातील रस्त्यांच्या कामांचा आढावा घेतला. मुख्यमंत्री ग्रामसडक योजना टप्पा २ (बॅच १) संशोधन व विकास अंतर्गत सांगली जिल्ह्यातील एकूण १६२.३० किलोमीटरच्या ४५ रस्त्यांची दर्जोन्नती करण्यासाठी प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली आहे. या रस्त्यांची कामे सुरू होण्यासाठी आवश्यक प्रक्रिया महिनाभरात पूर्ण करण्याचे आदेश यावेळी पालकमंत्री डॉ. सुरेश खाडे यांनी दिले. या रस्त्यांच्या कामासाठी एकूण २४९.११ कोटींच्या रकमेस प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.

चांदोली अभयारण्य व वारणा प्रकल्प बाधित प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाचा प्रलंबित प्रश्न प्रशासनाने संवेदनशीलतेने हाताळून प्रकल्पग्रस्तांना न्याय देण्याची भूमिका ठेवावी, अशा सूचना कामगार मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. सुरेश खाडे यांनी आज येथे दिल्या.

जिल्ह्यातील चांदोली अभयारण्य व वारणा प्रकल्प बाधित प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनप्रश्नी आढावा बैठकीच्या अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते. जिल्हाधिकारी कार्यालयाच्या बैठक सभागृहात झालेल्या या बैठकीस जिल्हाधिकारी डॉ. राजा दयानिधी, प्रभारी मुख्य कार्यकारी अधिकारी नंदिनी घाणेकर, अपर जिल्हाधिकारी डॉ. स्वाती देशमुख, जिल्हा पुनर्वसन अधिकारी रघुनाथ पोटे, उपवनरंसक्षक नीता कट्टे, जलसंपदा विभागाचे कार्यकारी अभियंता डी. डी. शिंदे, निशिकांत पाटील, सत्यजीत देशमुख यांच्यासह प्रकल्पग्रस्ताचे प्रतिनिधी उपस्थित होते.

मंत्रालयात मदत व पुनर्वसन मंत्री व वनमंत्री यांच्यासमवेत संयुक्त बैठक आयोजित करून चांदोली अभयारण्य व वारणा प्रकल्प बाधित प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाचा प्रलंबित प्रश्नासाठी पाठपुरावा करू, असे पालकमंत्री डॉ. सुरेश खाडे यांनी यावेळी सांगितले. मात्र, त्याचवेळी महसूल, जलसंपदा आणि वन विभागाने समन्वयाने काम करून जास्तीत जास्त प्रकरणे मार्गी लावावीत. त्यासाठी कँप आयोजित करावेत, असे त्यांनी यावेळी सूचित केले.

यावेळी प्रकल्पग्रस्तांनी त्यांचे प्रश्न मांडून पुनर्वसनाचा प्रलंबित प्रश्न मार्गी लावण्याची अपेक्षा व्यक्त केली. यावेळी जिल्हा पुनर्वसन अधिकारी व वनविभाग यांच्या नावे असलेल्या जमिनी प्रकल्पग्रस्तांना दाखवण्यात याव्या व पसंतीप्रमाणे तात्काळ वाटप करणे, आष्टा येथील वनविभाग यांच्या नावे असलेली जमीन तात्पुरत्या स्वरूपात कसण्यासाठी प्रकल्पग्रस्तांना देणे, निर्वाह भत्ता ६५ टक्के रक्कमेवरील व्याज किंवा इतर अनुदान तात्काळ वाटप करणे, डॉ. शामा प्रसाद मुखर्जी जनवन योजनेचा लाभ देणे आदी विषयांवर बैठकीत सविस्तर चर्चा करण्यात आली.

मुद्रक, प्रकाशक नरेश विठ्ठल देसाई यांनी राजदंड मिडीया प्रायव्हेट लिमिटेड, प्लॉट क्र. ५७, पवार कॉलनी, साताराासिटी, सातारा ४१५००२ करिता साहस प्रिंट्स, ६७/बी, रामनगर, पवार कॉलनी, शाहूपुरी, सातारा येथे छापून राजदंड मिडीया प्रायव्हेट लिमिटेड प्लॉट नंबर ५७, पवार कॉलनी, साताराासिटी, सातारा ४१५००२ येथे प्रसिद्ध केले. संपादक : नरेश विठ्ठल देसाई, दूरध्वनी - ९८३४६८७३६४, ईमेल - rajdand.punegmail.com RNI No. : 72105, Title Code: MAHMAR17902

Printed and Published by Naresh Vitthal Desai on behalf of Rajdand Media Private Limited Plot no. 57, Pawar Colony, Sataracity, Satara 415002 and Printed at Sahash Prints 67/B, Ramnagar, Pawar Colony, Shahupuri, Satara 415002 and Published at Rajdand Media Private Limited Plot No. 57, Pawar Colony, Sataracity, Satara 415002. Editor : Naresh Vitthal Desai, Phone - 9834687364, Email - rajdand.punegmail.com RNI No. : 72105, Title Code: M-HM-R17902

साताऱ्यात पहाटेपर्यंत डॉल्बी वाजणारचं; उदयनराजेंनी सुनावलं

सातारा : गणेश विसर्जन मिरवणुकीवरील वेळेचं बंधन आणि वाद्यांवरील निर्बंधावरून साताऱ्यात खासदार उदयनराजे भोसले आणि पालकमंत्री शंभूराज देसाईंनी एकमेकांना आव्हान दिलंय. प्रशासनाने नियमांचा बागुलबुवा उभा करून गणेशोत्सवाच्या उत्साहावर विरजण घालू नये. असे कितीसे पोलीस आहेत. तेवढा पोलीस फोर्स जिल्ह्याला पुरेसा नाही. त्यामुळं इथं पण युपी, बिहारच होईल, या गोष्टीचं पोलिसांनी भान ठेवावं. लाठीचार्ज झाला तर 'अरे ला कारे'ने उत्तर देता येईल, असं उदयनराजेंनी सुनावलं आहे. उदयनराजेंच्या या आव्हानाला पालकमंत्री शंभूराज देसाईंनी देखील प्रत्युतर दिलंय.

साताऱ्यात खासदार उदयनराजे भोसले आणि पालकमंत्री शंभूराज देसाई या दोघांनी स्वतंत्रपणे माध्यमांशी संवाद साधला. प्रथम उदयनराजेंनी संवाद साधत डॉल्बी वाजवण्यात येणार असल्याचे सांगून टाकले. मुंबई, पुण्यात डॉल्बी वाजविला जात असताना साताऱ्यात याला का बंदी? असा सवाल करत डॉल्बी नियमात राहून वाजवावा, असे म्हंटले. त्यांच्या या वक्तव्यानंतर पालकमंत्री देसाई यांनी देखील पत्रकार परिषद घेऊन डॉल्बी आणि उदयनराजेंच्या वक्तव्याबाबत सविस्तर भूमिका मांडली. यावेळी पालकमंत्री देसाई म्हणाले की, त्यांच्या उदयनराजेंचं वक्तव्य आम्ही तपासून घेऊ. शासनाचे नियम आणि हायकोर्टाचे काय निर्देश आहेत, त्याची माहिती उदयनराजेंना दिली जाईल. कोणी नियम आणि कायद्याचं उल्लंघन केल्यास त्यांच्यावर कायदेशीर कारवाई केली जाईल, असा इशारा पालकमंत्र्यांनी दिला आहे.

तर पालकमंत्री म्हणाले, कारवाई होणार

खा. श्रीमंत छत्रपती उदयनराजे भोसले यांचे वक्तव्य तपासणार : पालकमंत्री

खा. उदयनराजे भोसले यांनी डॉल्बीबाबत वक्तव्य केल्यानंतर पालकमंत्री देसाई यांनी देखील याबाबत प्रतिक्रिया दिली आहे. ज्यातील नियम व हायकोर्टाचे आदेश हे उदयनराजे यांना सांगितले जातील. तसेच इतर जिल्ह्यांमध्ये कायदा काय आहे याची माहितीही उदयनराजेंना अवगत केली जाईल. नियमाच्या बाहेर कुणीही गेलं आणि कायद्याचे उल्लंघन केल्यास पोलीस कडक कारवाई करणार. मग तो कोणीही असो, असे पालकमंत्री देसाई यांनी म्हंटले आहे. याचाच अर्थ पालकमंत्र्यांनी थेट खासदार उदयनराजेंच्या भूमिकेला आव्हान दिले आहे.

शासन नियमांचा बागुलबुवा उभा करुन, प्रशासनाने गणेशोत्सवाच्या उत्साहावर विरजण घालण्याचा प्रकार करु नये अशी रास्त अपेक्षा आहे. डॉल्बीच्या बाबतीत नियमांचे उल्लंघन झाल्यास कारवाई करावी तथापि एखादी बाब करुच नये यासाठी एका मर्यादेपलीकडे अट्टाहास करु नये, गणेश मंडळांना गणेशोत्सव निर्विघ्नपणे पार पडण्यासाठी प्रशासनाने सहकार्य करावे. गणेश मंडळांच्या कार्यकर्त्यांची मुस्कटदाबी होणार नाही अशी दक्षता प्रशासनाने घ्यावी अशी आवाहनात्मक सूचना आज प्रशासन आणि सर्व संबंधीतांना केली आहे.

सध्या सर्वत्र श्री गणेशाची स्थापना घरगुती स्वरुपांत आणि सार्वजनिक स्वरुपात संपूर्ण महाराष्ट्रात आणि देशात करण्यात आली आहे. या गणेशोत्सवात कार्यकर्ते युवकांचा उत्साह उदंड आहे. अनेख सार्वजनिक मंडळांनी सामाजिक, सांस्कृतिक देखाव्यांवर भर दिला आहे. येत्या तीन चार दिवसांनंतर या गणेशोत्सवाच्या उत्साहाला उधाण

येणार आहे. याकामी प्रशासनाने सार्वजनिक सुरक्षितेसाठी तसेच ध्वनीप्रदुषण इत्यादीबाबत नियमांची अंमलबजावणी निश्चितच सक्षमपणे केली पाहीजे. सुदैवाने सातारचे पोलिस प्रशासन सहकार्यात्मक योगदान देत कायदा व सुव्यवस्था राखण्यात महाराष्ट्रात अग्रगण्य आहे. तथापि शासन नियमांचा बाऊ करुन, कोणीही कोणत्याही प्रकारे श्री गणेश मंडळांची आणि गणेश भक्तांची मुस्कटदाबी करु नये जिथै चुकेल तेथे समजावून, सहकार्याची भुमिका प्रशासनाची असली पाहीजे अशी रास्त अपेक्षा आहे.

माणदेश फॉर्मसी महाविद्यालय म्हसवडमध्ये शिक्षक दिन साजरा

वरकुटे : ज्ञानगंगा एज्युकेशन सोसायटी संचलित, माणदेश इन्स्टिट्युट ऑफ फार्मासुटिकल सायन्स अँड रिसर्च सेंटर म्हसवड येथे शिक्षक दिन उत्साहात साजरा झाला.

यावेळी संस्थेचे अध्यक्ष आदरणीय डॉ. विवेकानंद श्रीरंग माने सर, उपाध्यक्ष बाळकृष्ण पांडुरंग लेंगरे सर संस्थापक सचिव प्रा. दादा कोडलकर सर, सहसचिव डॉ. वैभव श्रीरंग माने सर आणी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ नागराजू पोटनुरी यांनी सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना शिक्षक दिनाच्या शुभेच्छा दिल्या व विद्यार्थ्यांचे कौतुक केले.

शिक्षक दिनाचे महत्त्व महाविद्यालयाचे उपप्राचार्य भास्कर बनगर सर यांनी विशद केले. प्राध्यापक श्री. वेताळ कोडलकर सर यांनी डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांची जयंती शिक्षकदिन म्हणून का साजरा करतो याचे महत्त्व सांगितले व डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांचा इतिहास त्यांच्या उत्कृष्ट व्यक्तव्यातून सर्वासमोर मांडला.

याप्रसंगी सर्व शिक्षकांना पुष्प आणि लेखणी देऊन सन्मानित करण्यात आले. कार्यक्रमाचे नियोजन व सूत्रसंचालन विद्यार्थिनी कू. ऐश्वर्या बागल आणि कु ऋतूजा कदम यांनी केले. कार्यक्रमाचे आभारप्रदर्शन प्रा. श्री संकेत मेटकरी सर आणि प्राध्यापिका कु. वैष्णवी दहीवडे यांनी केले. कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे रजिस्ट्रार, कार्यालय अधीक्षक, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होते.

स्वागत समारंभानिमित्त उपस्थितांना पुस्तकांची 'अनोखी भेट'

वडूज : जोडीदाराच्या विवेकी निवडीचा विचार सर्वदूर पोहोचावा. आयुष्यभरासाठी जीवनसाथी निवडताना पत्रिका पाहण्याचा अवैज्ञानिक आणि पारंपरिक रिवाज आड येऊ नये. त्याऐवजी आवडीनिवडी आणि कर्तृत्वाला प्राधान्य दिले जावे आणि वाचनसंस्कृतीचा विचार घरोघरी पोहोचावा या प्रबोधनाच्या हेतुने स्वागत समारंभासाठी उपस्थितांना 'पत्रिका जुळवताना' हे डॉ. नितिन शिंदे लिखित पुस्तक भेट देण्यात आले. निमित्त होते डॉ. शिंदे यांच्या मुलाच्या निखिलच्या विवाहाप्रीत्यर्थ आयोजित केलेल्या स्वागत समारंभाचे. माणकेश्वर मल्टीपर्पज हॉल शास्त्रीनगर इस्लामपूर सांगली येथे हा कार्यक्रम पार पडला.

इस्लामपूर येथील अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे आघाडीचे कार्यकर्ते, अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिकेचे संपादक आणि कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेजचे प्रभारी प्राचार्य डॉ. नितीन शिंदे यांचे ज्येष्ठ चिरंजीव निखील आणि सातारा जिल्हा खटाव तालुक्यातील भुरकवडी येथील माजी सैनिक सयाजीराव श्रीरंग

मान्यवराना पुस्तक प्रदान करताना निवृत्त प्राचार्य श्री. शिंदे.

कदम यांची सुकन्या अंकिता हे उभयता भारतीय संविधानाला प्रमाण मानून नोंदणी पद्धतीने नुकतेच विवाहबद्ध झाले. विवाह संस्थेतल्या पारंपरिक रुढी, प्रथा आणि परंपरांना जाणीवपूर्वक फाटा देऊन त्यांनी सहजीवनाचा नवा पायंडा पाडला. पारंपरिक विवाह संस्कारात धान्याचे (तांदळाचे) माप ओलांडून सून गृहप्रवेश करते. यावेळी अंगणात फुलांचे झाड लावून अंकिताने घरात प्रवेश केला. या निमित्ताने आयोजित केलेल्या स्वागत समारंभात सदिच्छा देण्यासाठी उपस्थित असलेल्या नातेवाईक, मित्रमंडळी आणि मान्यवरांना डॉ. नितीन शिंदे लिखित 'पत्रिका जुळवताना' हे पुस्तक भेट देण्यात आले. लग्नावेळी पत्रिका जुळवण्यामागे असलेल्या सांस्कृतिक आणि आर्थिक हितसंबंधाचे राजकारण डॉ. शिंदे यांनी या पुस्तकात खणून काढले आहे. मुला मुलींचे विवाह ठरवताना पालकांनी पत्रिकेवर अवलंबून न राहाता कर्तृत्वाला अधिक महत्त्व द्यावे हा हे पुस्तक भेट देण्यामागे हेतू होता. भेट देण्यासाठी या पुस्तकाची विशेष आवृत्ती प्रकाशित करण्यात आली होती.

एका कुटुंबाला एक पुस्तक या प्रमाणे यावेळी सातशे पुस्तकांचे वितरण झाले.

इस्लामपूर येथील नाग नालंदा प्रकाशनाने हे पुस्तक प्रकाशित केले असून अंधश्रद्धा निर्मूलन समितीने त्याचे सर्वत्र वितरण केले आहे. वधूवरांना सदिच्छा देण्यासाठी महात्मा फुले शिक्षण संस्थेच्या जनरल सेक्रेटरी सरोज पाटील, संस्थेचे अध्यक्ष ॲड एन आर पाटील , माजी प्राचार्य विश्वास सायनाकर, कासेगाव एज्युकेशन सोसायटीचे सचिव प्राचार्य आर.डी.सावंत, ॲड. बी.डी. पाटील, राजारामबापू बँकेचे चेअरमन प्रा शामराव पाटील, प्रशांत वाजे, भुरकवडीचे सरपंच शिवाजीराव कदम, सोसायटीचे चेअरमन दिलीप कदम, कैलासराव जाधव, शरदराव कदम, मनोजदादा कदम आदीसह विविध क्षेत्रातील मान्यवर, शिंदे परिवार व कदम परिवार सदस्य उपस्थित होते.

क्रांती क्रिडा गणेश मंडळामार्फत विविध कार्यक्रम

म्हासुर्णे, : म्हासुर्णे ता.खटाव येथील क्रांती गणेश मंडळाची स्थापना १९८३ होवुन ४२ वर्षे पूर्ण झाली सालाबादप्रमाणे यंदाच्या वर्षीही गणेश मुर्ती स्थापना करण्यात आली आहे.

क्रांती गणेश मंडळाचे वैशिष्ट्य म्हणजे १८ पगड जातींच्या लोंकाचा समावेश या मंडळात आहे.या मंडळाने सांस्कृतिक कार्यक्रमाचे नियोजन असते कारण तरुण मुला मुलींना कला गुणांना वाव मिळावा यासाठी सांस्कृतिक कार्यक्रमाचे नियोजित केले जातात तसेच ऑर्केस्ट्रा ,पारंपारिक गजी नृत्य,लेझीम पथक,साज सारखे बैठकीजे हिंदी मराठी गाण्यांचा कार्यक्रम मंडळाचे सदस्य आयोजित करतात.गणेश उत्सव काळात महाराष्ट्राची लोकधारा असणाऱ्या व लोकसाहित्याची परंपरा असणाऱ्या विविध कार्यक्रमाचे आयोजन करुन समाजाला नवी दिशा देण्याचे

क्रांती क्रिडा गणेश मंडळाची आकर्षक गणेश मुर्ती (छाया - तुषार माने म्हासुर्णे)

काम मंडळ करत असते.याच मंडळाने क्रिडा क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केली आहे.क्रिकेट सामने,कबड्डी सामने भरवण्यात क्रांती मंडळाचा सिंहाचा वाटा असतो.आजही जुने मंडळाचे कार्यकर्ते खेळामध्ये उल्लेखनीय कामगिरी केली आपणास दिसत आहे.तसेच मंडळाच्या मार्फत म्हासुर्णे गावातील उल्लेखनीय कामगिरी केलेल्या भुमिपुत्रांचा सन्मान मंडळामार्फत शाल. श्रीफळ,सन्मान चिन्ह देवुन केला जातो.या वर्षी भव्य अशी ६.५ फुटाची मुर्ती मंडळाची आहे. सर्व समावेश सर्व गावातीलव वाडी वस्तीवरील सभासद या मंडळामध्ये सामाविष्ठ आहेत.त्यामुळे या मंडळामध्ये राजकीय लवलेश अजिबात नाही.राजकारण विरहीत असे मंडळांचे अखंड काम सुरु आहे. दरवर्षी प्रमाणे मंडळाच्या वतीने महापुजेचे आयोजन करण्यात आले आहे.यानिमित्त महाप्रसाद म्हणून भाविकांना स्नेहभोजनाची व्यवस्था करण्यात येते.दरवर्षी सुमारे १ हजार भाविक याचा लाभ घेत असतात. २००० सालापासुन मा.श्री. रमेश माने(शेठ) हे मंडळाच्या सत्यनारायण पुजेच्या निमित्ताने महाप्रसाद देतात हा महाप्रसाद पूर्ण गावातील लोकांच्या साठी असतो पूर्ण गावात आमंत्रण असते.क्रांती गणेश मंडळाने भगतसिंग,सुखदेव,राजगुरु,स्वामी विवेकानंद,छत्रपती शिवाजी महाराज ,तात्या टोपे,मंगल पांडे,वासुदेव फडके ,चंद्रशेखर आझाद,सुभाषचंद्र बोस,लोकमान्य टिळक,झाशीची राणी लक्ष्मीबाई आदीसह अनेक क्रांती कारकारकांचे स्मरण म्हणुन गणेश मुर्ती स्थापना केली असे अनेक विविध अनोखे कार्यक्रम आयोजित प्रत्येक वर्षी वेगवेगळे कार्यक्रम आयोजित केले जातात. क्रांती गणेश मंडळाने गणेशोत्सवाच्या निमित्ताने सामाजिक बांधिलकी जपत अनेक समाजपयोगी उपक्रम राबवले आहेत सर्व उपक्रमात मंडळाच्या कार्यकत्यांचा नेहमीच मोठा सहभाग असतो.मंडळाची स्थापना झाल्यापासुन आपआपल्या वेगवेगळ्या कार्यक्रम व उपक्रमाच्या माध्यमातून मंडळ नेहमीच पंचक्रोशित आपले वेगळे स्थान टिकवुन आहे.यंदाची गणरायाची मुर्तीही दिसायला देखणी व सुंदर आहे.गावातील प्रत्येक सामाजिक कार्यात क्रांती गणेश मंडळांचे कार्यकर्ते नेहमीच उत्स्फुर्तपणे सहभागी होत असतात अनोख्या उपक्रमाचे गावातील ग्रामस्थाकडुन तोंड भरुन कौतुक होत आहे.

सातारा प्रतिसरकारने स्वातंत्र्य चळवळीत दिलेले योगदान सुवर्णाक्षरांनी लिहून ठेवण्यासारखे : वैभव नायकवडी

सातारा : पद्मभूषण क्रांतिवीर डॉ. नागनाथअण्णा नायकवडी यांनी १० सप्टेंबर १९४४ ला सातारा जिल्हा कारागृहाच्या तटावरून टाकलेल्या उडीला ८० वर्षे पूर्ण झाल्याबद्दल आयोजित केलेल्या शौर्य दिनानिमित्त सातारा मध्यवर्ती कारागृहासमोर नुकताच एक कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी स्वातंत्र्यवीरांचे शौर्य, तो इतिहास आपण लक्षात ठेवला पाहिजे. तो आपण विसरता कामा नये. ती स्फूर्तीच खरी आपली प्रेरणा आहे. सातारा प्रतिसरकारने स्वातंत्र्य चळवळीमध्ये दिलेले योगदान सुवर्णाक्षरांनी लिहून ठेवण्यासारखे आहे, असे प्रतिपादन वाळव्याच्या हुतात्मा सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष वैभव नायकवडी यांनी केले.

कार्यक्रमासाठी सातारा येथील प्रतिसरकार समन्वय समितीचे

अभिवादन करताना वैभव नायकवडी.

प्रा. विश्वंभर बाबर, प्रा. दत्ताजी जाधव, विजय मांडके, विजय निकम, स्वातंत्र्यसैनिकांचे अनेक वारसदार तसेच हुतात्मा शिक्षण उद्योग समूहातील सर्व संस्थांचे आजी-माजी पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी वैभव नायकवडी म्हणाले, भारतीय स्वातंत्र्य चळवळीमध्ये सशस्त्र सेना उभी करून देशाला स्वातंत्र्य मिळवून देणे ध्येय होते. डॉ. नागनाथअण्णा नायकवडी यांनी सुभाषचंद्र बोस यांच्या विचाराने सशस्त्र क्रांती केली. या आंदोलनामध्ये त्यांना ब्रिटिशांच्या पोलिसांनी अटक केल्यानंतर कारागृह फोडून ते भूमिगत झाले.

शुक्रवारी विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा

वडूज : विविध स्पर्धा परिक्षांत यश मिळविलेल्या येथील छत्रपती शिवाजी हायस्कूल व ज्युनिअर कॉलेजच्या विद्यार्थ्यांचा शुक्रवारी सकाळी आठ वाजता गुणगौरव सोहळा होणार असल्याची माहिती संस्थेचे उपाध्यक्ष पृथ्वीराज गोडसे यांनी दिली.

पाचवी, आठवी स्कॉलरशिप, एन.एम.एम.एस. परिक्षा शिष्यवृत्तीधारक, शासकीय चित्रकला परिक्षा तसेच क्रिडा स्पर्धांत यश मिळविलेल्या विद्यार्थ्यांचा यावेळी सत्कार करण्यात येणार आहे.

खासदार धैर्यशिल मोहिते पाटील, निवृत्त कोकण आयुक्त प्रभाकर देशमुख, हरणाई सूतगिरणीचे संस्थापक रणजितसिंह देशमुख यांच्या हस्ते हा सत्कार होणार आहे. संस्थेचे अध्यक्ष दादासाहेब गोडसे यांच्या अध्यक्षतेखाली हा कार्यक्रम होणार आहे. यावेळी उपाध्यक्ष श्री. गोडसे, उपनगराध्यक्ष मनोज कुंभार, सचिव व्ही.आर.गोडसे, विकास अधिकारी आर.एन. घाडगे, माजी प्राचार्य सी.आर.गोडसे आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत. कार्यक्रमास नागरिकांनी उपस्थित राहण्याचे आवाहन प्राचार्य जे.एच. जाधव आदींनी केले आहे.

पत्रकारितेमध्ये सामाजिक बांधिलकी बरोबर रोजगार संधीही

वडूज : पत्रकारीतेच्या माध्यमातून सामाजिक बांधिलकी जोपासण्याबरोबरच रोजगाराच्या संधी उपलब्ध होतात असे मत साहित्यीक, ज्येष्ठ पत्रकार जयंत लंगडे यांनी व्यक्त केले.वडूज ता. खटाव येथील दादासाहेब जोतिराम गोडसे महाविद्यालयात हिंदी व मराठी विभागाच्यावतीने पत्रकारीतेमधील रोजगार संधी व संभाषण कौशल्य या विषयावर कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी पत्रकार आयाज मुल्ला, निवेदक राहूल कोळी यांची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एस.बी. पाटील होते.

यावेळी बोलताना श्री. लंगडे म्हणाले,

प्रारंभीच्या काळात हस्तलिखीत स्वरूपात होणारी पत्रकारीता काळाच्या ओघात बदलली आहे. पत्रकारीमध्ये आता आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर होऊ लागला आहे. त्यामुळे आता मोबाईलवरूनही बातमी लेखन करता येते. पत्रकारीतेला सामाजिक बांधिलकीची जोड असते. शिवाय पत्रकारीतेमधील विविध अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर वृत्तपत्र तसेच दृकश्राव्य माध्यमांत नोकरीच्या संधी होतात.

प्रा. बाबासाहेब साबळे, प्रा.डॉ.सविता केंजळे यांनी स्वागत केले. प्रा.डॉ.क्षितीज धुमाळ यांनी सुत्रसंचालन केले.

उपप्रादेशिक परिवहन कार्यालयाकडून वाहन नोंदणी नवीन मालिका सुरु

सातारा : उपप्रादेशिक परिवहन कार्यालय, फलटण या कार्यालयाकडून फलटण व माण तालुक्यातील दुचाकी एमएच-५३,चारचाकी (चक ५३-), परिवहन अवजड वाहनांसाठी एमएच ५३ बी, व रिक्षा एमएच ५३ सी संवर्गातील वाहन मालिका संगणकीय वाहन ४.० प्रणालीवरुन सुरु करण्यात आली आहे. ज्या वाहन धारकांना आकर्षक क्रमांक घ्यावयाचे आहेत त्यांनी कार्यालयाशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे आहे.

मालिकेतील क्रमांकाकरीता शासकीय नियमानुसार अर्ज व डीडी सकाळी १० ते दुपारी ३ वाजेपर्यंत स्विकारले जातील. ज्या अर्जदारास आपल्या वाहनास आकर्षक क्रमांक घ्यावयाचे आहेत त्यांनी विनंती अर्ज व डीडी भरुन आरक्षित करुन ठेवावेत. अर्जासोबत डीडी हा राष्ट्रीयकृत बँकेचा असावा तसेच सदर डीडी उपप्रादेशिक परिवहन फलटण या नावाने सादर करावा . अन्य मालिकेतील क्रमांक इतर वाहनासाठी हवा असल्यास तर नियमानुसार तिप्पट फी भरुन नोंदणी क्रमांक देण्यात येईल.

महाराष्ट्रावरील गुलाबीचं अन् फुलाफुलाचं संकट दूर होवो

अमोल कोल्हेंचा अजित पवारांना टोला

पुणे : राज्यामध्ये लवकरच विधानसभा निवडणूका होणार आहे. त्यासाठी अद्याप आयोगाने कार्यक्रम जाहीर केला नसला तरी देखील आढावा घेण्यास सुरुवात करण्यात आली आहे. त्यामुळे पक्षांचा प्रचार देखील वाढला असून नेत्यांच्या सभा वाढल्या आहेत. महायुतीसह माहविकास आघाडीमधील घटक पक्ष जोरदार तयारीला लागले आहे. शरद पवार गटाकडून विधानसभेच्या पार्श्वभूमीवर शिवस्वराज्य यात्रा काढण्यात आली आहे. स्टार प्रचारक आणि खासदार अमोल कोल्हे पुण्यामध्ये आले आहेत. त्यांनी बाप्पाचे दर्शन घेत माध्यमांशी संवाद साधला आहे.

खासदार अमोल कोल्हे यांनी पुण्याचे ग्रामदैवत असलेल्या मानाच्या पहिल्या कसबा गणपतीचे दर्शन घेतले. त्याचबरोबर पुण्यातील इतर सार्वजनिक गणपतींची देखील त्यांनी आरती केली. यानंतर अमोल कोल्हे यांनी माध्यमांशी संवाद साधला. यावेळी आगामी विधानसभा निवडणूकीसाठी शरद पवार गटाची तयारी कशाप्रकारे असेल याबाबत अमोल कोल्हे यांनी सांगितले. खासदार कोल्हे म्हणाले की, विधानसभेसाठी शरदचंद्र पवार सांगतील ते धोरण आणि बांधतील ते तोरण असेल असे मत अमोल कोल्हे यांनी पुण्यामध्ये व्यक्त केले.

काय म्हणाले अमोल कोल्हे?

माध्यमांशी संवाद साधताना अमोल कोल्हे म्हणाले की, बाप्पाकडे हेच मागितलं की,महाराष्ट्रावरील गुलाबीचं, फुलाफुलाचं, भ्रष्टाचाराचं, महिलांच्या असुरक्षिततेचं संकट दूर होऊ दे. सर्वसामान्य तरूणांचे स्वाभिमानी सरकार येऊ दे, हीच मागणी बाप्पाकडे आहे, असे म्हणत अमोल कोल्हे यांनी

अजित पवार यांना अप्रत्यक्षपणे कोपरखळी दिली. पुढे ते म्हणाले की, महायुतीच्या ज्या काही योजना येतात,त्या योजनांची नावे वेगवेगळी आहेत. कालच वर्षा बंगल्यावरील एक देखावा पाहिला. चांगल्या गोष्टींचे कौतुक झाले पाहिजे पण महायुतीच्या भ्रष्ट कारभाराला जनता कंटाळली आहे. महाविकास आघाडीचा सूर्य उगवल्याशिवाय राहणार नाही महाराष्ट्राचा जनमाणसांना काय हे सगळ्यांनाच माहित आहे. शरदचंद्र पवार सांगताल ते धोरण आणि बांधतील ते तोरण, असे विधान करत अमोल कोल्हे यांनी विधानसभा निवडणूकीचा विश्वास व्यक्त केला आहे.

याआधी देखील अमोल कोल्हे यांनी अजित पवारांवर निशाणा साधला होता. गोंदियामधील शिवस्वराज्य यात्रेमध्ये अमोल कोल्हे यांनी अजित पवार यांच्यावर टीका केली होती. ते म्हणाले होते की, येऊ नको म्हटलं तरी कोणत्या गाडीत बसू अशी अवस्था अजित पवार गटाची झाली आहे. महायुतीच्या सव्हेंमध्ये अजित पवारांना फक्त १२ जागा मिळतील, मग बाकीच्या २८ आमदारांचे काय करायचे हा प्रश्न त्यांच्या डोळ्यासमोर असल्याने दादांनी बिहार पॅटर्ननुसार मुख्यमंत्रीपदाची मागणी केली असेल, असा टोला खासदार अमोल कोल्हे यांनी अजित पवार यांना लगावला होता. त्यानंतर आता त्यांनी पुण्यामधून देखील अजित पवारांवर निशाणा साधला आहे.

अजित पवार यांनी पुण्यातील विविध सार्वजनिक गणेश मंडळाना दिली भेट

पुणे : उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी पुण्यातील विविध सार्वजनिक गणेश मंडळाना भेटी देऊन दर्शन घेतले आणि श्री गणेशाची आरती केली. यावेळी उपमुख्यमंत्री श्री. पवार यांचा विविध मंडळांच्यावतीने सत्कार करण्यात आला.

यावेळी श्री. पवार यांनी कसबा गणपती, श्रीमंत भाऊसाहेब रंगारी गणपती ट्रस्ट, श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती मंदीर, अखिल मंडई गणेशोत्सव मंडळ, श्री तुळशीबाग सार्वजनिक गणपती उत्सव मंडळ, गुरुजी तालिम गणपती मंडळ, छत्रपती राजाराम मित्र मंडळ, केसरीवाडा गणेशोत्सव आणि भोलेनाथ मित्रमंडळाला भेटी देऊन दर्शन घेतले.

यावेळी कसबा गणपतीचे अध्यक्ष श्रीकांत शेटे, श्रीमंत भाऊसाहेब रंगारी गणपती ट्रस्टचे अध्यक्ष संजीव जावळे, श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती मंदीराचे अध्यक्ष माणिक चव्हाण, अखिल मंडई गणेशोत्सव मंडळाचे अध्यक्ष अण्णा थोरात, श्री तुळशीबाग सार्वजनिक गणपती उत्सव मंडळाचे अध्यक्ष विकास पवार, गुरुजी तालिम गणपती मंडळाचे अध्यक्ष प्रवीण परदेशी, छत्रपती राजाराम मित्र मंडळाचे अध्यक्ष युवराज निंबाळकर, केसरीवाडा गणेशोत्सवाच्या डॉ. गीताली टिळक आणि भोलेनाथ मित्रमंडळाचे अध्यक्ष तथा माजी उप म-हापौर दीपक मानकर, म ाजी स्थायी समिती अध्यक्ष हेमंत रासने तसेच मंडळाचे विश्वस्त, पदाधिकारी उपस्थित होते.

भौगोलिक मानांकने प्राप्त फळांच्या लागवडीस विशेष चालना द्यावी : दादाजी भुसे

मुबंई : राज्यात फळ लागवडीस शेतकरी मोठ्या प्रमाणात प्राधान्य देत असून भौगोलिक मानांकने प्राप्त फळांच्या लागवडीस विशेष चालना देण्याच्या दृष्टीने विभागाने प्रयत्न करावेत, अशा सूचना फलोत्पादन मंत्री दादाजी भुसे यांनी दिल्या.

मंत्रालयात एकात्मिक फलोत्पादन विकास अभियान यासंदर्भात आयोजित आढावा बैठकीत श्री.भुसे यांनी दूरदृश्य संवाद प्रणालीद्वारे मार्गदर्शन केले. बैठकीस सचिव जयश्री भोज यांच्यासह वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

यावेळी फलोत्पादन मंत्री श्री. भुसे यांनी एकात्मिक फलोत्पादन विकास अभियानांतर्गत शेतकऱ्यांना फळांवरील प्रक्रियेच्या माध्यमातून अधिक लाभ मिळण्याच्यादृष्टीने विभागाने नाविन्यपूर्ण संकल्पना राबवाव्यात. त्याचसोबत मालेगाव, नाशिक, सोलापूर यासह विविध भागात मोठ्या प्रमाणात डाळिंबांचे उत्पादन घेण्यात येत आहे. या पार्श्वभूमीवर डाळिंबापासून रस निर्मितीच्या प्रकल्पाचा प्रस्ताव सादर करण्याच्या सूचना दिल्या. कृषी विद्यापीठांनीही या संदर्भात संशोधनाचे पूरक तपशील नवीन उपक्रमासाठी घ्यावे. याबाबतीत राज्यस्तरीय तज्ज्ञांचे मार्गदर्शन घेऊन डाळींबाच्या रसनिर्मिती प्रक्रिया केंद्राच्या बाबतीत प्रस्ताव सादर करण्याचे श्री. भुसे यांनी सूचित केले. फळप्रक्रिया बाबतीत इतर राज्यांच्या कामाचा आढावा घेऊन चांगल्या, यशस्वी ठरलेल्या संकल्पनांची पाहणी करावी. शेतकऱ्यांना सोयीचे ठरणारे 'कॉमन फॅसिलिटी सेंटर' उभारण्याचे नियोजन करावे, त्या-त्या तालुक्यातील फलोत्पादन पद्धतीनुसार फळ लागवड करण्यास प्रोत्साहन द्यावे, अशा सूचना श्री. भुसे यांनी दिल्या.

लसणाची आता पुन्हा एकदा दरवाढीची मोठी झेप

सांगली : सुमारे वर्षभरापूर्वी ४०० ते ५०० रुपये किलोवर जाऊन सर्वसामान्यांना घाम फोडणाऱ्या लसणाने आता पुन्हा एकदा दरवाढीची मोठी झेप घेतली आहे. सध्याच्या ऐन सणासुदीच्या दिवसांत तो ४०० रुपये किलोवर जाऊन पोहोचला आहे. १०० रुपयांत अवघा पाव किलो लसूण खरेदी करताना गृहिणींचे बजेट ढासळू लागले आहे.

तीन-चार महिन्यांपूर्वीपर्यंत गल्लोगल्ली फिरुन ५० रुपये किलो दराने लसूण विकणारे विक्रेते आता दिसेनासे झाले आहेत. दरवाढीने त्यांनाही किरकोळ विक्री परवडत नसल्याचे सांगत आहेत. सध्याचा किरकोळ बाजारातील भाव आणखी वाढून ६०० रुपये

प्रति किलोपर्यंत पोहचण्याचा अंदाजही त्यांनी व्यक्त केला. जुन्या लसणाची आवक संपली आहे. गेल्या साडेतीन महिन्यांपासून पावसाने ठिय्या मारल्याने नवा लसूण बाजारात आलेला नाही. त्यामुळे उपलब्ध बाजारात लसणाचे भाव झपाट्याने वाढले आहेत.

व्यापाऱ्यांनी सांगितले की, यावर्षी संपूर्ण देशभरातच लसणाचे उत्पादन खालावले आहे. मे महिन्यापासूनच पावसाने जोर धरल्याने नवी लावण लांबली किंवा कमी झाली. त्याचा परिणाम दरवाढीवर झाला. सांगलीच्याघाऊक बाजारपेठेत चांगल्या दर्जाचा लसूण ३०० रुपये किलो दराने मिळत आहे.

सामान्यत: जानेवारी ते मे दरम्यान नवीन लसणाचे उत्पादन होते. पण यंदा त्याचा साठा लवकरच संपला आहे. मध्य प्रदेश, राजस्थान, गुजरात आणि हिमाचल प्रदेशातून येणारा लसूणही घटला आहे. नवा लसूण बाजारात येण्यास नोव्हेंबर उजाडू शकतो, त्यानंतरच दर कमी होण्याची शक्यता आहे. याच काळात महाराष्ट्रात सणांची धांदल सुरु असते. त्यामुळे मागणी तेजीत राहून दरदेखील कडक राहू शकतात.

ड्रायव्हींग लायसन्सच्या 'स्मार्ट कार्ड' रूपांतरणासाठी १५ सप्टेंबरपर्यंत मुदत

मुंबई : ताडदेव प्रादेशिक परिवहन कार्यालयामार्फत ड्रायव्हींग लायसन्सचे स्मार्ट कार्डमध्ये रूपांतर करण्याची मोहीम हाती घेण्यात आली आहे. ज्या वाहन चालकांनी मानवी हस्ते अनुज्ञप्ती प्राप्त केली आहे, अशा वाहन चालकांनी १५ सप्टेंबर २०२४ पर्यंत अनुज्ञप्तीचे (ड्रायव्हींग लायसन्स) संगणक प्रणालीद्वारे स्मार्ट कार्डमध्ये रूपांतर करण्याचे आवाहन प्रादेशिक परिवहन अधिकारी भरत कळसकर यांनी केले आहे.

१५ सप्टेंबर नंतर मानवी हस्ते प्राप्त झालेल्या अभिलेखाचे स्मार्ट कार्डमध्ये रूपांतरण केले जाणार नाही याची अनुज्ञप्ती धारकांनी नोंद घ्यावी. मुंबई (मध्य) ताडदेव येथील प्रादेशिक परिवहन कार्यालयाच्या (आरटीओ) परिसरात कार्यालयीन इमारतीचे बांधकाम, आय ॲण्ड सी सेंटर, वाहन चालक प्रशिक्षण केंद्राचे बांधकाम होणार आहे.

रुपाली चाकणकरांना विधानपरिषदेची उमेदवारी?

पक्षातील वादानंतर अजित पवारांनी स्पष्ट केली भूमिका

मुबंई,: महाराष्ट्र विधानपरिषदेच्या राज्यपाल नियुक्त १२ जागांच्या यादीवर कॅबिनेट बैठकीत लवकरच शिक्कामोर्तब केलं जाण्याची शक्यता आहे. सत्ताधारी महायुतीत ६ जागा भाजपला तर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेला आणि उपमुख्यमंत्री अजित पवारयांच्या राष्ट्रवादीला प्रत्येकी ३ जागा मिळणार असल्याचे समजते.

अजित पवारांच्या राष्ट्रवादीच्या तीन संभाव्य नावांची यादीही काही दिवसांपूर्वी चर्चेत आली होती. मात्र पक्षाने अद्याप कोणत्याही नावांवर शिक्कामोर्तब केलं नसून सदर यादी चुकीची असल्याचा खुलासा अजित पवार यांच्याकडून आज पुण्यात पत्रकारांशी संवाद साधताना करण्यात आला आहे.

अजित पवार यांनी म्हटलं की, राज्यपाल नियुक्त विधानपरिषदेच्या आमदारांबाबत आम्ही अद्याप कोणत्याही नावांवर शिक्कामोर्तब केलेलं नाही. मात्र तुमच्याच माध्यमातून मला काही नावं

वाचायला मिळाली. ही नावं वाचून आमचीही करमणूक झाली, असा उपरोधिक टोला त्यांनी लगावला आहे.

दरम्यान, विधानपरिषदेच्या जागेसाठी राष्ट्रवादीच्या महिला प्रदेशाध्यक्षरुपाली चाकणकरयांचंही नाव चर्चेत आल्याने पक्षात धुसपूस निर्माण झाली होती. यावर अजित पवार म्हणाले की, या नावांबाबतची चुकीची बातमी पसरवली गेली होती. त्यामुळे त्यावरून वाद होण्याचा प्रश्नच नाही आणि त्याबाबत चर्चाही करण्याचं काही कारण नाही.कोणत्या तीन नेत्यांची नावे होती चर्चे त?राज्यपाल नियुक्त १२ जागांचा तिढा बऱ्याच काळापासून प्रलंबित आहे. महाविकास आघाडी सरकार असताना राज्यपालांनी या यादीच्या मंजुरीला विलंब केल्यानंतर हे प्रकरण कोर्टात गेले होते. त्यानंतर आता विधानसभा निवडणुकीच्या आधी या जागांची नियुक्ती व्हावी, यासाठी महायुतीकडून प्रयत्न केले जात असल्याचं दिसत आहे. अजित पवारांच्या पक्षाकडूनरुपाली चाकणकर, आनंद परांजपे आणि सिद्धार्थ कांबळे यांचं नाव समोर आलं होतं. मात्र आता अजित पवार यांनी याबाबतचे वृत्त फेटाळलं आहे.रुपाली ठोंबरेंनी काय म्हटलं होतं?एक व्यक्ती एक पद या न्यायानुसार आमचे नेते अजितदादा न्याय नक्की देतील असा विश्वास आहे. एकाच महिलेला किती पदे देणार? कालपासून बातमी वाचत आहे, बातमीची शहानिशा केली तर पक्षाने कोणतेही पत्र अधिकृत दिले नाही असे सांगितले. पक्षाला कळकळीची विनंती असेल, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीमध्ये इतरही महिला आहेत. त्या सक्षमतेने, दमदार कामाने मोठ्या आहेत. पक्षात कर्तुत्वान महिला खूप आहेत त्या सक्षम, काम करणाऱ्या महिलांचा विचार करावा आणि इतर महिलांना समान संधी द्यावी, अशी विनंती रुपाली पाटील ठोंबरे यांनी केली होती.

'बाल संगोपन'मधील सहा हजारांवर बालके नियमित अनुदानापासून वंचित

कोल्हापूर, : क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले बालसंगोपन संगोपन योजनेतील लाभासाठी आतापर्यंत ८ हजार १६२ मुला, मुलींच्या पालकांनी महिला व बालकल्याण विभागाकडे अर्ज केला आहे. यातील पात्र ठरलेल्या सहा हजार बालकांचे पालकही नियमित अनुदानापासून वंचित आहेत. दोन हजार १६२ अर्जदार मंजुरीच्या प्रतिक्षेत आहेत. याचे पालक तालुका ते जिल्हा कार्यालयातील संबंधीत कार्यालयात वारंवार हेलपाटे मारत आहेत. शासनाचे काम आणि सहा महिने थांब असा अनुभव येत आहे.

विधानसभेची निवडणूक डोळ्यासमोर ठेवून लाडक्या बहिणीला दर महिने १५०० रूपये जमा करणारे शासन मात्र परिस्थितीमुळे अनाथपण आलेल्या बालकांना मात्र दर महिने २२५० रूपये निर्वाह भत्ता देण्यासाठी टाळटाळ करीत असल्याचा आरोप होत आहे.

अर्ज केल्यानंतर जिल्हयाच्या ठिकाणी बालकल्याण समितीसमोर मुलांना समक्ष नेऊन पडताळणी करून घ्यावी लागते. योजनेतील अर्जदारांची गृहचौकशी होते. विविध टप्यातील प्रक्रियेसाठी प्रचंड विलंब होत आहे. सर्व प्रक्रिया पूर्ण करून पात्र ठरल्यानंतर नियमितपणे लाभाची रक्कम मिळत नसल्याच्या तक्रारी आहेत. सुमारे १४०० पेक्षा अधिक पात्र मुलांना जुलै २०२३ पासून अनुदान जमा झालेले नाही. उर्वरित मुलांचे मार्च मार्च २०२४ पासून अनुदान मिळालेले नाही. महिला व बाल कल्याण विभागाचे जिल्हयाचे कार्यालय मध्यवर्ती शासकीय इमारतीमध्ये आहे. तेथील प्रमुख अधिकारी सुहास वाईंगडे कार्यालयात भेटत नाहीत आणि मोबाईल क्रमांकावर संपर्क साधल्यानंतर रिसीव्ह करीत नसल्याच्या अनेक तक्रारी आहेत. असे बेभरोशाचे अधिकारी महिला, बालकाचे काय कल्याण करणार असा प्रश्न उपस्थित होत आहे. .एक पालक असलेले बालके. कुटुंबातील न्यायालयीन वाद, तंटे, वादविवादामुळे बाधीत झालेले बालके.कुष्ठरोग, जन्मठेपची शिक्षा भोगत असलेले वडीलांची, एचआयव्ही किंवा इतर गंभीर आजार असणाऱ्या पालकांची मुले.दोन्ही पालक दिव्यांग असलेल्यांची मुले. शासनाकडून अनुदान आल्यानंतर लाभार्थींच्या खात्यावर जमा केले जाते.

किरीट सोमय्या पहिल्यांदाच पक्षाच्या निर्णयावर संतापले

मुंबई : एकीकडे जागावाटप आणि एकमेकांवर टीका-टिप्पणी केल्यामुळे महायुतीमध्ये धुसफूस सुरू आहे तर अशातच आता भाजपचे माजी खासदार किरीट सोमय्या कमालीचे नाराज झाले आहेत. किरीट सोमय्या यांची निवडणूक आयोग संपर्क प्रमुख म्हणून नियुक्ती केली आहे. पण, 'मला न विचारता नियुक्ती का केली,' असं म्हणत सोमय्यांनी आपल्याच पक्षाचा निर्णय नाकारला आहे.

विधानसभा निवडणुकीसाठी भाजपने जोरदार तयारी सुरू केली आहे. विधानसभा निवडणुकीसाठी भाजपची व्यवस्थापन समिती जाहीर केली आहे. रावसाहेब दानवे यांच्या अध्यक्षतेखाली ही समिती स्थापन करण्यात आली आहे. किरीट सोमय्या यांना पुन्हा पक्षाचं काम देण्यात आलं आहे. निवडणूक संपर्क प्रमुख म्हणून किरीट सोमय्या यांच्याकडे जबाबदारी सोपवली आहे. तर विशेष आमंत्रित म्हणून नितीन गडकरी, चंद्रशेखर बावनकुळे, देवेंद्र फडणवीस, विनोद तावडे, आशिष शेलार, नारायण राणे, पियुष गोयल, गणेश नाईक आणि हंसराज अहिर यांच्या नावाची घोषणा केली आहे. पण, भाजपच्या या घोषणेमुळे सोमय्या कमालीचे नाराज झाले असून रावसाहेब दानवे यांना पत्र लिहिलं आहे.

'आपण विधानसभा निवडणुकीसाठी निवडणूक आयोग संपर्क प्रमुख म्हणून माझ्या नावाची मला न विचारता घोषणा केली ही पद्धत चुकीची आहे, मला हे अमान्य आहे. आपण यासाठी अन्य कोणाची तरी नियुक्ती करावी,' असं म्हणत सोमय्यांनी आपली नाराजी पत्रातून बोलून दाखवली आहे.

तसंच, '१८ फेब्रुवारी २०१९ रोजी भाजप-शिवसेनेची ब्ल्यू सी हॉटेल वरळी इथं संयुक्त पत्रकार परिषद झाली होती. त्यावेळी उद्धव ठाकरे यांच्या आग्रहामुळे भाजप नेत्यांनी मला पत्रकार परिषदेतून जाण्यास सांगितलं होतं. तेव्हापासून मी भाजपचा एक सामान्य सदस्य, कार्यकर्ता म्हणून काम करतोय. मधल्या काळात मी ठाकरे सरकारचे घोटाळे काढण्याची जबाबदारी स्वीकारली होती. माझ्यावर तीनवेळा जीवघेणे हल्लेही झाले. तरीही मी ही जबाबदारी पार पाडली. गेली साडेपाच वर्ष सामान्य सदस्य म्हणून आपण माझ्यावर प्रेम करत आहात, ते पुरेसे आहे,' असं म्हणत सोमय्यांनी मनातली खदखद बोलून दाखवली.

'मी विधानसभा निवडणुकीसाठी मी स्वत:ला पूर्णपणे झोकून दिले आहे. मी काम करतोय आणि करत राहणार आहे. आपल्या या समितीचा मी सदस्य नाही. आपण आणि प्रदेशाध्यक्षांनी पुन्हा अशा प्रकारची अपमानास्पद वागणूक देऊ नये,' असं म्हणत सोमय्यांनी विनंती सुद्धा केली आहे.

ऑलिम्पिक विजेता स्वप्निल कुसळेला 'पुनीत बालन ग्रुप'कडून ११ लाखांचे बक्षिस

पुणे : 'पॅरिस ऑलिम्पिक'मध्ये कांस्य पदक पटकावून भारताची मान उंचावणारा मराठमोळा नेमबाज स्वप्निल कुसळे याला 'पुनीत बालन ग्रुप'कडून ११ लाखांचे बक्षीस देण्यात आले आहे. 'पुनीत बालन ग्रुप'चे अध्यक्ष आणि युवा उद्योजक पुनीत बालन यांच्या हस्ते कुसळे यास पुण्यात हा बक्षिसाचा धनादेश देण्यात आला.

कोल्हापुरचा सुपुत्र असलेल्या कुसळे याने 'पॅरिस ऑलिम्पिक' गाजवत नेमबाजीत ५० मीटर रायफल स्पर्धेत थ्री पोझिशनमध्ये कांस्यपदक पटकावले. १९५२ सालच्या ऑलिम्पिकमध्ये खाशाबा जाधव यांनी कुस्तीत कांस्यपदक जिंकले होते. त्यानंतर ऑलिम्पिकमध्ये वैयक्तिक पदक जिंकणारा स्वप्नील कुसळे हा महाराष्ट्राचा

दुसरा खेळाडू ठरला आहे. त्याच्या या कामगिरीची दखल घेत युवा उद्योजक पुनीत बालन यांनी त्याला ११ लाख रुपयांचे बक्षीस जाहीर केले होते. सोमवारी हिंदुस्थानातील पहिला सार्वजनिक गणपती असलेल्या 'श्रीमंत भाऊसाहेब रंगारी गणपती'च्या आरतीचा मान कुसळे याला देण्यात आला. यावेळी त्यास ११ लाख रुपयांचा बक्षिसाचा धनादेश पुनीत बालन यांच्या हस्ते सुपुर्द करण्यात आला.

यावेळी बोलताना स्वप्निल कुसळे याने 'पुनीत बालन ग्रुप'चे आभार मानले. ''मी गणपती बाप्पाचा भक्त आहे. बाप्पाचा आशीर्वाद माझ्या पाठिशी आहे, त्यामुळेच कांस्य पदक मिळाले. श्रीमंत भाऊसाहेब रंगारी गणपतीची आरती करण्याचा मान मिळाला हे माझे भाग्य समजतो,'' अशा शब्दांत यावेळी कुसळे याने आपल्या भावना व्यक्त केल्या. यापूर्वीही 'पुनीत बालन ग्रुप'ने अनेक गुणी आणि होतकरु खेळाडूंना आर्थिक मदत करुन त्यांच्या पुढील प्रवासात खारीचा वाटा उचलला आहे. त्यांच्या या कार्याचा समाजाच्या सर्वच स्तरातून गौरव करण्यात येत आहे. नेमबाजी स्पर्धेत कांस्य पदक मिळवत स्वप्निलने केवळ महाराष्ट्राचंच नाही तर देशाचं नाव जगात उज्वल केलं. त्याच्यासारखे अनेक प्रतिभावान खेळाडू घडण्याची गरज आहे. त्यादृष्टीने त्यांना प्रोत्साहन देण्यासाठी 'पुनीत बालन ग्रुप' अशा खेळांडूंच्या कायम पाठिशी राहिला आहे. भविष्यात स्वप्निल निश्चितच भारतासाठी सुवर्णपदक जिंकेल असा विश्वास आहे. त्यासाठी त्याला 'श्रीमंत भाऊसाहेब रंगारी गणपती ट्रस्ट' आणि सर्व बाप्पाच्या सर्व भक्तांकडून शुभेच्छा, असं पुनीत बालन यांनी म्हटल आहे.